॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव (दि. ९ ) प्रतिनिधी - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या माध्यमातून रसायनशास्त्र प्रशाळेतील विविध विभागात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले. यात एकूण २८ विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये नियुक्तीचे पत्र देण्यात आले आहे.

या निवड प्रक्रियेत साय एज अॅब्स्ट्रॅक्ट्स, पुणे, सर्व्हायव्हल टेक्नॉलॉजीज प्रा. लि., न्यू एरा अॅडहेसिव्ह अॅण्ड सीलंट्स प्रा. लि., नोव्हा अॅग्री टेक प्रा. लि., सिद्धार्थ कार्बोकेम प्रा. लि., प्रिसिजन केम प्रा. लि., ठाणे तसेच एस. पी. अॅडव्हान्स्ड इंजिनिअरिंग मटेरियल्स प्रा. लि. या उद्योगसंस्थांनी सहभाग नोंदविला.

या प्रक्रियेत निकिता  चौधरी, साक्षी पाटील, वैष्णवी पाटील, निलेश जाधव, योगिता गोस्वामी, भावेश भामरे, तुषार शेलार, प्रणव पाटील, वैष्णवी अ. पाटील, कुणाल मराठे, भाग्यश्री कोठावदे, चेतन सुर्यवंशी, कल्पेश हिरे, सुमित पाटील, हर्षल वायंडेसकर, अक्षय सैंदाणे, समाधान सुर्यवंशी,निखील पाटील, सिमरन पाटील, रेणुका पाटील, मोहित पाटील, प्रणाली पाटील, कविता माळी, दर्शना पाटील, पंकज बोराडे, महेश पाटील, प्रणव कुलकर्णी, सचिन पाटील यांसह इतर विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

ही प्रक्रिया केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. उज्ज्वल डी. पाटील, उपसमन्वयक प्रा. रामेश्वर चव्हाण आणि नियुक्ती अधिकारी सोनाली दयामा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे,  प्रा. दीपक दलाल, प्रा. रत्नमाला बेंद्रे, प्रा. विकास गिते तसेच समन्वयक डॉ. अमरदीप पाटील यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ — दिनांक: ९ मे, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता